P.V.G.'s

# Muktangan English School & Jr. College,

44, Vidyanagari, Parvati, Pune - 411009.

## Formative Written Test - I (2025-26)

## Standard - VIII

Subject : Marathi — Marks : 20

Date : 07/08/2025 — Time : 8.30 am to 9.30 am

प्र.१ अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

प्रथम निसर्ग. आपण निसर्गाला कधीही विसरून चालणार नाही. त्याच्या विरोधात न जाता मर्जीत राहणं केव्हाही आपल्या फायद्याचं आहे. निसर्गातून आपलं पालनपोषण होतं आणि निसर्गच आपल्याला नाना कला शिकवतो. निसर्ग धुंडाळत रहा, तुम्हाला सर्जनाच्या वाटा आपसूक सापडतील.

आता तुम्हाला माझीच गोष्ट सांगतो. माझं प्राथमिक शिक्षण एका लहानशा खेड्यात झालं. माझं खेडं अतिशय निसर्गरम्य आणि सुसंस्कृत होतं. घनदाट जंगलं. दुथडी भरून वाहणारी नदी. निळे डोंगर, हिरवी रानं. अवघा आनंदी आनंद! अशा वातावरणात माणसातली सर्जनशीलता उफाळून आली नाही तर नवलचं! माझा एक मित्र होता. आम्हांला खूप वाटायचं, की आपण चित्रं काढावीत; पण काय करणार? आमच्याकडे कसलीच साधनं नव्हती. पेन्सिल, रंग, ब्रश हे तर सोडाच, साधा कागदही नव्हता. अभ्यासाची एकच वही. पाटीवर लिहिण्याची एक पेन्सिल. तिचे तुकडे झाले, तरी सांभाळून वापरावी लागायची. दुसरी मिळण्याची शक्यता नव्हती. शिवाय सगळ्यात मोठी अडचण किंवा धाक असा होता, की चित्रंबित्रं काढलेली ना मास्तरांना आवडायची ना घरातल्यांना. वात्रटपणा वाटायचा.)

१) आकृतिबंध पूर्ण करा. (1)

[ ] — लेखकाने त्यांच्या खेड्याचे सांगितलेले विशेष — [ ]

२) स्वमत – (2)

''निसर्गच आपल्याला नाना कला शिकवतो'' या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

३) कारण लिहा. (1)

पेन्सिल सांभाळून वापरावी लागायची कारण ____________

४) खालील शब्दांसाठी उताऱ्यात आलेले समानार्थी शब्द शोधा व लिहा. (1)

१) आपोआप –  २) सखा –

प्र.२ अ खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

कर्णिका : काय गं जिव्हाताई, नेहमी तू बडबडत असतेस नि आज गप्प गप्प का? एवढी उदास का बरे झाली आहेस?

जिव्हाताई : काय सांगू बाई! मला या पोटोबा खवय्येची मोठी चीड यायला लागलीय.

कर्णिका : अन् ती ग का?

जिव्हाताई : का म्हणून काय विचारतेस, आत्ता मघाशी रामराव-शामरावांचं बोलणं ऐकलंस ना तू? पोटासाठी वणवण हिंडावं लागतं त्यांना. कोणाही माणसाला विचारा, सारी धडपड कशासाठी तर पोटासाठी! आणि त्या पोटोबामुळे आपलीही फरफट होते. शिवाय मानसन्मान तो सगळा त्याला. परवा तर त्याचं-माझं भांडणच झालं.

कर्णिका : कशावरून गं?

जिव्हाताई : अग, दरवेळी आपला तो म्हणेल तेवढंच खायची सक्ती असते माझ्यावर! एखादवेळी मला आवडलेला पदार्थ मी जर जास्त खाल्ला, की झालं याचं गुरगुरणं सुरू! वैताग नुसता.

कर्णिका : खरंच गंऽ बाई. शिवाय हे पोटोबा महाशय नुसतंच बसून खातात. आपल्यासारखं काही काम करत नाही की काही नाही. ही आलीच बघ नासिका. काय ग नासिके, तुला काय वाटतं?

नासिका : कशाबद्दल?


कर्णिका : अगं ही बडबडी, पोटोबाबद्दल तक्रार करतीय. तिचं म्हणणं आहे, की पोटोबा खवय्ये काहीच काम करत नाहीत.

नासिका : मग त्यात खोटं ते काय? माझंच बघ ना, रात्रंदिवस श्वास घेण्याचं माझं कार्य सतत चालूच असतं. वास घेण्याचंही जादा काम मी करते; पण हे पोटोबा मात्र....

हस्तकराज : काहीच काम करत नाहीत.

पदकुमार : उलट सगळ्यांवर गुरगुरतो. शिवाय जो उठतो तो, 'कशासाठी? पोटासाठी', म्हणत आम्हाला राबवून घेतो.

१) आकृतिबंध पूर्ण करा. (1)




२) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** (2)

१) रात्रंदिवस श्वास घेण्याचे कार्य कोण करते?

२) पोटोबाच्या खवय्येपणाची चीड कोणाला आली होती?

३) पुढील शब्दांचे लिंग ओळखा. (1)

१) सेवक - २) एकता -

४) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (1)

१) प्रगती × २) व्यक्तिगत ×

५) पुढीलपैकी कोणत्याही एका वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. (1)

१) पोटासाठी वणवण हिंडणे

२) फरपट होणे

प्र.३) खालील कविता वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात
भव्य पटांगण, बाग मनोहर
फुला-पाखरांचे जग सुंदर,
आपुलकीचा सुवास पसरे
मनामनांतून इथे निरंतर.
गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.
पायाभरणी अस्तित्वाची
प्रयोगशाळा व्यक्तित्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई
इथे रुजवणूक त्या तत्त्वांची.
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.
नवीन स्वप्ने, नवीन आशा
ही प्रगतीची नवपरिभाषा,
परिश्रमाने, अभ्यासाने
उन्नत बनवू आपुल्या देशा
मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

१) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (2)

१) कवीने वर्णिलेल्या प्रतिभेची प्रभात कुठे होणार आहे?

२) प्रगतीची नवपरिभाषा कोणती?

२) गोलातील शब्दांचा आधार घेऊन चौकटी पूर्ण करा. (1)

१) अमूल्य शिकवण ⟶ (कोणाची) ⟶ [ ]

२) पायाभरणी ⟶ (कशाची) ⟶ [ ]

३) खालील प्रश्नाचे उत्तर तुमच्या शब्दात लिहा. (2)

१) ''तन सुदृढ'' आणि ''मन विशाल'' या शब्दसमूहांचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.

## व्याकरण

प्र.४ अ) खालील वाक्यांचे प्रकार ओळखून वाक्य पुन्हा लिहा. (2)

१) श्वास घेतल्याशिवाय माणूस जगू शकेल का?

२) आमच्या गावात आठवडी बाजार भरायचा.

३) मुलांनो, अभ्यास करा.

४) शाबास! छान चित्र काढलेस तू.

आ) खालील वाक्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. (1)

महेश रमेश आणि जयेश माझे मित्र आहेत

इ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा. (1)

पूर्वी वाहतुकीची साधने कमी होती.

❖❖❖